17 - 18 (10)

Impact Factor - 3.452

ISSN - 2348-7143

# INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

## PEER REFREED & INDEXED JOURNAL

December : 2017

SPECIAL ISSUE - XXII

Guest Editor
Prin. Dr. Dilip Shinde

Chief Editor
Dr. Dhanraj Dhangar

Executive Editor
Dr. Kiran Rakibe

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC) Sr.No.40107 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictonary of Research Journal Index (DRJI)

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रॉनिक्स प्रसारमाध्यमे : एक दृष्टिक्षेप | श्री दिलीप जाधव | 05 |
| 2 | इलेक्ट्रॉनिक्स प्रसारमाध्यमे आणि सर्वसामान्य माणूस | डॉ. राहुल पाटील | 13 |
| 3 | आकाशवाणी : एक प्रभावी संप्रेपण माध्यम | श्रीमती सारिका गांगुर्डे | 17 |
| 4 | इलेक्ट्रॉनिक्स मीडिया आणि मराठी भाषा, साहित्य | डॉ. शैलेन्द्र काळे | 21 |
| 5 | इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे : मराठी भाषा आणि वाङ्मय | श्री महादेव रोकडे | 24 |
| 6 | इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे : भाषा व साहित्य | श्री कपिल शिंदे | 30 |
| 7 | इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांमुळे मराठी भाषेपुढे निर्माण झालेली आव्हाने | डॉ. आनंद बल्लाळ | 36 |
| 8 | मराठी साहित्यातील एक माध्यम : भाषांतर युग | श्री देविदास शिंदे | 41 |
| 9 | व्हॉट्सअॅप : स्वरूप, भाषा व साहित्य | डॉ. दिलीप पवार | 44 |
| 10 | साहित्य आणि वृत्तपत्र : एक अनुबंध | डॉ. किरण पिंगळे | 48 |
| 11 | दूरदर्शन कार्यक्रम आणि मराठी भाषा | श्री नारायण पाटील | 52 |
| 12 | इलेक्ट्रॉनिक्स शोध व भाषा अध्ययन | डॉ. पौर्णिमा बोडके | 54 |
| 13 | संचार भाषा के रूप में हिंदी | श्री निलेश पाटील | 57 |
| 14 | इलेक्ट्रॉनिक्स मीडिया से मानव का सरोकार | शिवशंकर ईश्वर कट्टी | 60 |
| 15 | इलेक्ट्रॉनिक्स मध्यामों में हिंदी | डॉ. मीनल बर्वे | 65 |
| 16 | जनसंचार माध्यम और हिंदी भाषा | श्री समाधान गांगुर्डे | 69 |
| 17 | इलेक्ट्रॉनिक्स मीडिया और हिंदी | श्रीमती मंगला भवर | 72 |
| 18 | मीडिया क्षेत्र में रोजगार के अवसर | डॉ. पोपट कोटमे, श्रीमती मनीषा नाठे | 75 |
| 19 | इलेक्ट्रॉनिक्स मीडिया : एफ.एम. हिंदी | डॉ. दीपा कुचेकर, श्री राजेश झनकर | 80 |
| 20 | मीडिया, साहित्य तथा सामाजिक सरोकर | डॉ. गीता यादव | 85 |
| 21 | *Visualizing the Future of Learning Social Media Helping Education : Blending Technology and Information* | **Dr. A. Tiwari & Dr. R. Unnisa** | 88 |
| 22 | *Literature and Media : Interrelated Issues* | **Dr. Dinkar Nerpagar** | 96 |
| 23 | *Social Media : A Helpful Tool for Psychological Counselling at College* | **Dr. Joseph Rodrigues** | 99 |
| 24 | *Impact of Electronic Media on ELT: An Analysis* | **Dr. Khushbu Trehan** | 102 |
| 25 | *An Innovative Practice in ICT: Learning English through Cartoon Serial 'Chhota Bheem'* | **Dr. Premji Parmar** | 108 |
| 26 | *Multimedia and English Classroom* | **Mr. Hemkant Dhade** | 112 |
| 27 | *Role of Teacher: Conventional to Call* | **Mr. Milind Thakare** | 114 |

| | | |
|---|---|---|
| 28 | *Electronic Media: Languages and Literature* **Ms. Nisha Endait** | 119 |
| 29 | *Adaptation of Indian Literature into Indian Hindi Cinema* **Mr. Prashant Bankar** | 127 |
| 30 | *Computer Assisted Language Teaching in Indian Context* **Mr. Anand Sanap** | 131 |
| 31 | *A Brief Survey of English Language on Social Media* **Mr. Anil Ahire** | 136 |
| 32 | *Use of Technology in English Language Teaching and Learning* **Ms. Kalpana Shinde** | 140 |
| 33 | *Teaching and Learning of English Communication Skills &The Digital Age* **V.V. Raymale & R.V.More** | 148 |
| 34 | *Is Electronic Media Responsible for Verbal Combat?* **Ms. Kiran Mungad & V. M. Ambekar** | 154 |
| 35 | *E-Learning and Traditional Classroom Experiences : Some Comparative Considerations* **Dr. Sachin Rajole** | 157 |
| 36 | *Teaching of Technical English and Communication Skills to Technicians : Difficulties And Remedies* **Seema Dhoble** | 161 |
| 37 | *Impact of Electronic Media on Reading Culture* **Dr. Mohini Gurav** | 166 |
| 38 | *Integrating Mobile Apps into English Language Teaching and Learning: A Genuine Need* **Dr. Rajendra Gholap** | 172 |
| 39 | *Importance of Local Language in Indian Social Media* **Dr. Sadhana Patil** | 178 |
| 40 | Teaching of Drama by Going beyond the Text **Ms. Manjusha Nerkar** | 184 |
| 41 | *Impact of Modern Technology on the Process of Film Adaptation* **Ms. Pranali Jadhav** | 187 |
| 42 | *Electronic Media and Language Change* **Mr. Sahebrao Kamble** | 190 |
| 43 | *Electronically- Influenced Reading Culture* **Dr. Kiran Rakibe** | 193 |
| 44 | *Impact of Whatsapp Messenger Usage on Students Academic Performance* **Dr. Shubhangi Gosavi** | 196 |
| 45 | *Electronic Media - English Language and Literature* **Mr. Somnath Mahale** | 200 |
| 46 | *Women's Try For Independence In Henric Ibsen's 'A Doll's House'* **Dr. Eknath Bhalerao** | 203 |
| 47 | *Use of Computer in Teaching English Literature* **Kishore Nikam** | 207 |
| 48 | *Role of Electronic Media in Second Language Teaching* **Pawanjay Sudewad** | 210 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

❖ Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com www.researchjourney.net : 9665398258

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 22 : Language, Literature & Media | December 2017
UGC Approved No. 40107 & 44117

# व्हॉट्सअॅप : स्वरूप, भाषा व साहित्य

डॉ. दिलीप पी. पवार
समन्वयक व मराठी विभागप्रमुख
मराठी संशोधन केंद्र,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

जनसंचार माध्यमांमध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी स्वतःचे अमीट स्थान निर्माण केले आहे. दृक आणि श्राव्य स्वरूपात अत्यंत शीघ्रगती माहिती पुरविणारी प्रभावी माध्यमे म्हणून आपल्याला या माध्यमांकडे पाहता येईल. हजारो मैलांवर घडणाऱ्या घटितांची वास्तव, जिवंत माहिती काही क्षणात दर्शक व श्रोते यांना पुरविणारी ही माध्यमे असल्याने माणसे या माध्यमांची गुलाम झालेली पाहावयास मिळतात. रेडिओ, दूरदर्शन, सिनेमा, इंटरनेट, मल्टिमिडिया ही सर्वच इलेक्ट्रॉनिक माध्यमे केवळ बातम्या, माहिती देण्याचेच काम करीत नसून मनोरंजन, समीक्षा, घटना आणि विचारांचे विश्लेषण, जाहिराती आणि नानाविध विषयांची माहिती पुरविणारी आवश्यक अशी साधने झालेली आहे.

जाने. २००९ मध्ये जेन कूम याने अॅपलचा आयफोन खरेदी केला. त्याद्वारे या अॅपला जबरदस्त मार्केट मिळण्याची शक्यता त्याला वाटली. ब्रायन एक्टन याच्यासोबत त्याने भागीदारी करून व्हॉट्स अॅपला जन्म दिला.

आजचा जमाना टॅबलेट नि स्मार्टफोनचा आहे. सर्वच वयोगटातील व्यक्तींना या स्मार्टफोनने मोहिनी घातलेली आहे. कारण यातून आपण आपले कुटुंबीय, समूह, सदस्य, मित्र परिवार यांच्याशी संपर्कात राहून आपले विचार, भावना त्यांच्याशी वाटून घेत असतो. बोटाच्या एका इशाऱ्यावर व्हॉट्सअॅप याद्वारे आपण आपल्या स्नेहजनांशी संवाद साधू शकतो. या अर्थवाही संवादासाठी व या सर्व गोष्टी जाणून घेण्यासाठी व्हॉट्सअॅप फोटोज, व्हिडीओ, संगीत, संपर्क क्रमांक, तत्कालीन स्थिती या माध्यमांतून व्हॉट्सअॅप प्रणाली सक्रिय झालेली असते. हे अॅप स्वतःहून मोबाईल क्रमांकांना आयात करते आणि व्हॉट्सअॅप प्रोफाईल पिक्चर वरून वा मोबाईल नंबरवरून आपल्याला आपल्या मित्रांची माहिती मिळते. जगभरात या अॅपचे सात कोटीपेक्षा जास्त वापरकर्ते आहेत.

**व्हाट्स अॅपचे ठळक फायदे**

१) टेलिकॉम कंपन्यांच्या अवाजवी कॉल आणि मॅसेज यांच्यापासून सुटका करते. पर्यायाने हे अॅप विनाशुल्क उपलब्ध आहे.

२) अनेक स्माईलीज अर्थात इमोजीचा आपण यात वापर करू शकतो ही चित्रभाषा तत्काळ संदेश प्रक्रियेसाठी प्रभावी ठरते.

३) संदेश पाठविण्यासाठी मेल वा अन्य संदेश सेवेपेक्षा कमी वेळात हे अॅप मदत करते.

४) ग्रुप चॅटिंगच्या बाबतीत येथे स्वातंत्र्य असल्यामुळे अपेक्षित व्यक्ती व ग्रुपशीच आपल्याला संवाद साधणे सोपे होते.

५) व्हाईसनोटस्, ग्रुप गेरोज, ऑटो डाऊनलोड या सुविधा यात उपलब्ध आहेत.

International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013) December 2017
Special Issue 22 : Language, Literature & Media
UGC Approved No. 40107 & 44117

६) व्हॉट्सॲप मॅसेंजरद्वारा नवनवीन फीचरद्वारा सर्व नंबरवर एक मॅसेज पाठवू शकतो. २०१४ मध्ये व्हॉट्सॲप हे फेसबुक कुटुंबाचा एक भाग झालेले आहे.

**तोटे**

१) टेलेमार्केटिंग कंपन्यांना हे ॲप जाहिरातीसाठी खुले करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांचा मारा सहन करावा लागतो.

२) व्हॉट्सॲप चालविण्यासाठी आपल्या मोबाईलला इंटरनेट पॅक किंवा फ्री वायफाय असणे आवश्यक असते.

३) व्हॉट्सॲप मोबाईलमध्ये समाविष्ट करण्यासाठी आपला वैयक्तिक तपशील गरजेचा असतो.

४) व्हॉट्सॲप आपल्या सर्व फाईल सेव्ह करतो त्यामुळे त्या हॅक केल्या जाऊ शकतात.

५) मोबाईलमधील जास्तीत जास्त जागा व्हॉट्सॲप वापरतो. त्यामुळे मोबाईच्या कार्यप्रणालीवर परिणाम होतो. ग्रुपमध्ये येणाऱ्या संदेशांचे प्रमाण जास्त असल्याने आवश्यक माहिती मिळवण्यात अडथळे येतात.

**सेवा उपलब्धी व भाषा**

**I) प्रोफाईल पिक्चर**

WhatsApp वरील Profile Picture (Display Picture) मध्ये टाकले जाणारे सिंगल फोटोज त्या व्यक्तीच्या आत्मप्रेमाची व स्वअस्तित्वाची साक्ष देणारे असतात. फॅमिली फोटोजमधून त्या कुटुंबाच्या सर्व सदस्यांतील परस्परप्रीतीचा, स्नेहबंध संबंधांचा परिचय होतो. या फोटोंमधून गतस्मृतींचे स्मरण करण्याचाही प्रयत्न केला जातो. DP मधून आपल्या मानसिक भावना, इच्छा यांचे प्रकटीकरण होत असते. त्यावर मिळणाऱ्या likes वा comments वापरकर्त्याच्या स्वःला कुरवाळण्याचा प्रयत्न करतात व कारणीभूत ठरतात. त्यामुळे या युगाचा स्थायीभाव Like & Comments झाला आहे. चित्रातील ही भाषा वापरकर्त्यांच्या स्वभावातील सौंदर्य, त्यांच्या अस्तित्व, नखरेलपणा, आत्मप्रेम, कर्तृत्व, गुणप्रदर्शन, मित्रता, प्रेम, सहानुभूती आदी पैलूंचे दर्शन घडविण्याचे काम करते. मोठेपणा, प्रसिद्धीची हाव, शब्दचित्रांमधून त्याच्या वैयक्तिक व वैचारिक जाणिवा, विचारधारेचा प्रत्यय यायला मदत होते.

**II) व्हॉट्सॲप छायाचित्रांची भाषा**

WhatsApp वर मोबाईल कॅमेरा तसेच अन्य कॅमेऱ्यांनी घेतलेले अनेक फोटोज, प्रतिमा, वर्तमानपत्रातील कात्रणे, विविध उपक्रमांची छायाचित्रे नेहमीच post केली जातात. यात दिवसभरातील, आठवडाभरातील विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कौटुंबिक वा अन्य क्षेत्रांतील विविध छायाचित्रांचा समावेश असतो. या सर्व छायाचित्रांच्याखाली वापरकर्त्याने इंग्रजी वा अन्य प्रादेशिक भाषांत त्याचे विवरण केलेले असते वा त्यावर टिपण्णी दिलेली असते. माहिती आदानप्रदान, कर्तृत्वाचा परिचय, दिवसभरातील घटनाक्रमाचा परिचय पुरविणे वा प्रतिक्रिया आजमाविणे याला वापरकर्त्याकडून विशेष महत्त्व दिलेले असते.

**III) दृकश्राव्य संदेश (ऑडिओ-व्हिडिओ मॅसेज)**

WhatsApp वर विविध चित्रपटांचे ट्रेलर, दुर्घटना, सुखद प्रसंग, वन्य वा प्राण्यांचे व्हिडिओज, विविध न्यूज चॅनलवरील ठळक बातम्या, निवडक लक्षवेधी उपक्रम, इनोव्हेटिव्ह आयडियाज, नेते,

समाजसुधारक, साहित्यिक यांच्या भाषणांच्या, उपक्रमांच्या व्हिडिओ क्लिप्स, लग्नसमारंभ, बालक्रीडा, प्रबोधनपर उपक्रम, शैक्षणिक प्रयोग, शौर्यगाथा, जागतिक आश्चर्यकारक घडामोडी आदी घटितांचे आदानप्रदान होत असते. यातून प्रबोधन, मनोरंजन, उद्बोधन या गोष्टींबरोबरच मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रातील नानाविध घटितांची माहिती मिळाल्याने ज्ञानप्राप्ती, लोकजागृती इ. गोष्टी घडताना दिसतात. या सर्व पोस्ट टाकण्यामागे प्रसिद्धी, प्रशंसाप्राप्ती, माहिती आदानप्रदान, मदत, जाणीवजागृती, सूचना, अस्तित्वभान, गुणप्रदर्शन आदी हेतू असतात.

**IV) Text Masage**

WhatsApp वरील Text Message चे स्वरूप विविधांगी आणि नाना क्षेत्रे कवेत घेणारे असते. या मॅसेजेसची भाषा, मराठी, हिंदी, इंग्रजी वा प्रादेशिक बोली या स्वरूपाची असते. या Message मध्ये कविता, कथा, विनोद, गाणी, तत्त्वज्ञान, स्फुटलेखन, लघुसंदेश, शुभसंदेश, सुविचार, शुभ सकाळ व रात्र विषयक सुभाषित वजा उद्बोधनपर संदेश आदींचा समावेश असतो. या व वरील संदेशांमध्ये पाठविणाऱ्यांचे नाव व नंबर असतो. शिवाय कर्त्याचे नावदेखील अपवादात्मक साहित्यप्रकारात असते. मुद्रित स्वरूपातील ही माहिती वर्तमानपत्रे वा अन्य मुद्रित माध्यमांमध्ये प्रकाशित होणे बहुधा जागेअभावी अशक्य असते. अशावेळी WhatsApp चा प्रभावी आणि समर्पक वापर वापरकर्ते करून घेताना दिसतात. संकलित माहितीमधून होणारे मनोरंजन, प्रबोधन, धार्मिक, तात्त्विक, एतिहासिक, शैक्षणिक आदी स्वरुपाची असते. साहित्यिक, राजकीय नेते, विचारवंत, तत्त्ववेत्ते आदींचे स्वलिखित साहित्य या माध्यमातून मोठ्या समूहापर्यंत त्या-त्या भाषेत जाते. साहित्य, संस्कृती, शिक्षण, उद्योग, वैद्यक, वास्तुकला, अभियंते, शिक्षक, राजकारणी, पक्षनिहाय कार्यकर्ते, विद्यार्थी, अधिकारी वर्ग, बचत गट, कामगार वर्ग, महिला गट आदी सर्वांचेच ग्रुप तयार झालेले असतात. अशा सर्वच ग्रुपमधून वैयक्तिक वा अन्य कार्यालयीन माहितीचे आदानप्रदान होते. या माहितीचे सर्जनात्मक वा संकलित अशा दोन प्रकारचे स्वरूप असल्याने संकलित माहितीमध्ये श्रेष्ठ तसेच दुय्यम दर्जाचे साहित्य वाचावयास मिळते. मात्र सर्जनात्मक लेखनामध्ये त्या-त्या लेखकाच्या, विचारवंताच्या तत्त्वज्ञानाच्या, कवींच्या स्वतंत्र प्रतिमेचा आविष्कार झालेला पाहावयास मिळतो. यात प्रादेशिक भाषांमधील साहित्यांचाही समावेश होतो. या साहित्याला एक वैचारिक मूल्यही प्राप्त झालेले असते. जीवनातील परिवर्तनासाठी यातील बरेचसे मार्गदर्शनपर लेखन महत्त्वाचे ठरते. उभरत्या व जाणत्या वयातील साहित्यिक, कलावंत मोठ्या समूहमनापर्यंत पोहोचण्यासाठी हे माध्यम महत्त्वपूर्ण भूमिका वठवित असते.

मात्र व्हॉट्सॲपवर येणारे साहित्य जे वर्तमान स्थितीवर भाष्य करणारे असते ते मार्मिक, आशयप्रधान, प्रगल्भतेचे दर्शन घडविणारे असते. अशा प्रातिनिधिक रचनांचा कर्ता हा अनामिक असतो. मात्र या पोस्ट सर्वत्र अत्यंत वेगाने फिरत असतात. त्याला वाचकांची पसंतीदेखील मोठ्या प्रमाणात मिळते. वर्तमान समाजवास्तवाचे उत्तम प्रतिबिंब उमटलेल्या या संदेश साहित्याला अलीकडील लोकसाहित्य म्हणावयाला हरकत नाही कारण, याचा कर्ता कोणी एक असला तरी संदेश व्हायरल झाल्यानंतर त्या कर्त्याचा विसर लोकांना पडलेला असतो. इंग्रजी संदेशाच्या भाषेत इंग्रजी संवादाच्या भाषेने एक वेगळेच रूप धारण केलेले पाहावयाला मिळते. उदा. अलीकडच्या काळात व्हॉट्सॲपच्या माध्यमातून येणाऱ्या

ISSN : 2348-7143
December 2017

साहित्यातून लोकप्रबोधन, लोकजागृती घडविताना दिसून येते. तसेच समाजातील व समाज संस्थामधील विसंगतीवर मार्मिकपणे बोट ठेवते. यामुळेच अलीकडच्या काळात WhatsApp वरील विविधांगी अभिव्यक्ती ही समकालीन तरुण मनांची वा समाजमनाची उत्स्फूर्त व उत्कट अभिव्यक्ती समजली जाते. यामुळेच समाजातील विविध हेतू व उद्दिष्टांनी एकत्र येऊन विशिष्ट नावांनी groups तयार करून त्या संदर्भात आपली अभिव्यक्ती करताना दिसून येतात. यामुळेच सकारात्मकदृष्ट्या बघितल्यास WhatsApp ला समूह-समविचारधारांना चळवळीचे रूप देण्यासाठी एक आधुनिक लोकमाध्यम म्हणून महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. या माध्यमांची भाषा शिक्षणक्षेत्रालाही वेगळया रूपात स्पर्श करू पाहत आहे.

झी २४ तासवर दाखविलेल्या एका बातमीनुसार दहावी/ बारावीच्या उत्तरपत्रिकेत English SMS ची भाषा उत्तरासाठी वापरलेली आढळली. उदा. the (d), that (dat) have (hv) will (ll), what (wat) because (bcoz), Fabulous (fab), thanks (thnx) okay (k) आदी हे रूप मात्र वेळ बचतीसाठी फायद्याचे असले तरी भाषिक उपयोजनाच्या दृष्टीने घातक आहे. कारण त्याला भाषिक अर्थ नाही.

**WhatsApp च्या आगामी योजना**

WhatsApp वापरण्याचे नवीन मार्ग, व्यवसायासाठी संवाद साधणे, ऑर्डर देणे, व्यवहार करणे, अपॉईन्टमेंट माहिती, डिलीव्हरी आणि शिपिंग नोटिफिकेशन, उत्पादन व सेवा, मार्केटिंग आदी पर्याय शोधत आहेत. उदा. तुमच्या आगामी विमान प्रवासाचे फ्लाईट स्टेटसबद्दलची माहिती WhatsApp द्वारा मिळविता येईल. या विषयासंदर्भात अधिक चर्चा विमर्श होणे आवश्यक आहे. कारण समकालिन समाजमनाची ही प्रभावी अभिव्यक्ती आहे.

**निष्कर्ष**

१) वर्तमानकाळातील अत्यंत लोकप्रिय आणि मोठ्या प्रमाणात वापरले जाणारे ॲप म्हणून WhatsApp चा वरचा नंबर लागतो.

२) सर्वच वयोगटातील व्यक्तींना सहजतेने हाताळता येईल, संदेशाचे आदानप्रदान करता येईल इतके सोपे ॲप म्हणून ते लोकप्रिय ठरले.

३) व्हॉट्सॲपमुळे वापरकर्त्याला आपापल्या आवडीच्या, परिचयाच्या भाषेत अभिव्यक्त होण्याचे स्वातंत्र्य असल्याने प्रादेशिक भाषिक अभिसरण होण्यास हे ॲप फायदेशीर ठरते.

४) ॲन्ड्रॉईड सुविधा असलेला अर्थात स्मार्टफोनधारकांनाच याचा वापर करता येत असल्याने गरीब, तळागाळातल्या व्यक्तींना या सेवेचा लाभ मिळत नाही.

५) मोजके संयत, निवडक माहितीचीच देवाण-घेवाण ही पथ्ये पाळल्यास हे ॲप वरदान ठरणारे आहे.

६) वर्तमान आजच्या धकाधकीच्या, ताणतणावाच्या जीवन वाटचालीत माणसाला आनंद व आत्मसुख शोधण्यासाठी एक प्रभावी पर्याय म्हणून WhatsApp कडे पाहता येईल.

७) आधुनिक चळवळीचे वा समूहसमविचारधारांचे एक लोकमाध्यम म्हणून व्हॉट्सॲपला महत्त्व प्राप्त झाले आहे.